# पुणे विद्यापीठ

पुणे विद्यापीठाच्या स्थावर विभागामध्ये खालील विद्यापीठ निधीतील पदे सरळ सेवेने करार पध्दतीने एक वर्ष कालावधीसाठी एकत्रित वेतनावर भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात मंगळवार, दिनांक १० जानेवारी, २०१२ पर्यंत ऑन लाईन (Online) अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील ऑन लाईन (Online) भरावयाचा अर्ज पुणे विद्यापीठाच्या **http://recruitment.unipune.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र | पदाचे नांव | पदाचा वर्ग | पदसंख्या | प्रवर्ग /पदनिहाय आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ब | ०४ | खुला - २, अनु.जमाती - १, विजा (अ) - १ |
| २ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | ब | ०१ | खुला - १ |

विहित नमुन्यातील ऑन लाईन **(Online)** भरावयाचा अर्ज तसेच वरील पदांची शैक्षणिक अर्हता, पदनिहाय आरक्षण, अनुभव, वयोमर्यादा आणि वेतन इत्यादीसंबंधीची माहिती पुणे विद्यापीठाच्या http://recruitment.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

वरील पदांसाठी ऑन लाईन **(Online)** अर्ज मंगळवार, दिनांक १० जानेवारी, २०१२ पर्यंत भरुन त्याची प्रिंट आऊट घेऊन स्वाक्षरीसह एक प्रत आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती, नजिकच्या काळातील पासपोर्ट आकाराचे स्वतःचे छायाचित्र आणि कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांचे नांवे काढलेला राष्ट्रीयकृत बँकेचा खुल्या गटातील उमेदवारांसाठी रु. ३००/-चा व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु.१५०/- चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) गुरुवार, दिनांक १२ जानेवारी, २०१२ पर्यंत मा.कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ४११ ००७ यांच्याकडे पोस्टाने पाठवावा अथवा समक्ष जमा करावा. सदर दिनांकानंतर पोस्टाने किंवा इतर माध्यमातून प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

जाहिरात क्र.:४४ डॉ.मा.ल.जाधव
दिनांक : २९/१२/२०११ कुलसचिव

# पुणे विद्यापीठ

पुणे विद्यापीठाच्या स्थावर विभागामध्ये खालील विद्यापीठ निधीतील पदे सरळ सेवेने **करार पध्दतीने एक वर्ष कालावधीसाठी एकत्रित वेतनावर** भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात **मंगळवार, दिनांक १० जानेवारी, २०१२ पर्यंत ऑन लाईन (Online)** अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील ऑन लाईन (Online) भरावयाचा अर्ज पुणे विद्यापीठाच्या **http://recruitment.unipune.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | पदनाम / एकत्रित वेतन | पदाचा वर्ग | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)<br><br>एकत्रित वेतन<br>दरमहा रु.३५०००/- | ब | ०४ | खुला - २<br>अनु.जमाती - १<br>विजा (अ) - १ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी परीक्षा उत्तीर्ण. अथवा स्थापत्य अभियांत्रिकी पदविका परीक्षा प्रथम श्रेणी अथवा ए ग्रेड मध्ये उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेमधील प्रत्यक्ष इमारत बांधकाम व पर्यवेक्षण तसेच दैनंदिन कामाचे पर्यवेक्षण, पत्रव्यवहार व करारनामे, अंदाजपत्रके तयार करणे इत्यादींचा किमान तीन वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| २. | कनिष्ठ अभियंता (विद्युत)<br><br>एकत्रित वेतन<br>दरमहा रु.३५०००/- | ब | ०१ | खुला - १ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी पदवी परीक्षा उत्तीर्ण. अथवा विद्युत अभियांत्रिकी पदविका परीक्षा प्रथम श्रेणी अथवा ए ग्रेड मध्ये उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेमधील प्रत्यक्ष इमारत बांधकाम व पर्यवेक्षण तसेच दैनंदिन कामाचे पर्यवेक्षण, पत्रव्यवहार व करारनामे, अंदाजपत्रके तयार करणे इत्यादींचा किमान तीन वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>३. कारखाना, सब स्टेशन, उच्चदाब विद्युत वाहिनी, जनरेटर, दूरध्वनी यंत्रणा, वातानुकूलित यंत्रे, निवासी व अनिवासी इमारती यांचे विद्युत परिक्षण व नवीन इमारतींचे स्वतंत्रपणे विद्युत भार संकल्पन तसेच प्रत्यक्ष काम करवून घेण्याची क्षमता असणे आवश्यक.<br>४. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

## - सर्वसाधारण सूचना -

- **अर्ज शुल्क आणि अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत व पत्ताः**

**ऑन लाईन (Online)** अर्ज **मंगळवार दिनांक १० जानेवारी, २०१२** पर्यंत भरुन त्याची प्रिंट आऊट घेऊन स्वाक्षरीसह एक प्रत आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती, नजिकच्या काळातील पासपोर्ट आकाराचे स्वतःचे छायाचित्र आणि कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांचे नांवे काढलेला राष्ट्रीयकृत बँकेचा खुल्या गटातील उमेदवारांसाठी रु. ३००/-चा व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु.१५०/- चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) **गुरुवार, दिनांक १२ जानेवारी, २०१२ पर्यंत मा.कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ४११ ००७** यांच्याकडे पोस्टाने पाठवावा अथवा समक्ष जमा करावा. सदर दिनांकानंतर पोस्टाने किंवा इतर माध्यमातून प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

- **वयोमर्यादाः**

१. अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास वयोमर्यादा गणली जाईल.
२. वरील पदांसाठी किमान २५ वर्षे आणि कमाल ३५ वर्षे. (मागासवर्गीय उमेदवारांना पाच वर्षे शिथीलक्षम.)
३. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील अनुसूचित उल्लेख करण्यात आलेल्या विद्यापीठातील आणि पुणे विद्यापीठ क्षेत्रातील महाविद्यालयात कार्यरत सेवकांसाठी उच्चतम वयोमर्यादेची अट लागू नाही.
४. राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादा विहित वयोमर्यादेपेक्षा पाच वर्षे शिथिलक्षम राहील.
५. खुला तसेच राखीव प्रवर्गातील अपंग उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादेची अट वयाच्या ४५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील.
६. शासन निर्णयातील तरतूदीनूसार खेळाडूसाठी राखीव असलेल्या पदांसाठी खेळांडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून वयोमर्यादा विहित वयोमर्यादेपेक्षा पाच वर्षे शिथिलक्षम राहील.
७. खुल्या तसेच राखीव प्रवर्गातील प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना वयोमर्यादा वयाच्या ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

- **मागासवर्गीयांचे आरक्षण :**

१) जातीच्या दाव्याच्या पुष्टयर्थ महाराष्ट्र अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम - २००० मधील तरतुदींनुसार सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.
२) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. आणि इ.मा.व. प्रवर्गाच्या, अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूचा दावा करणा-या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्यास तसे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतच्या नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे अन्यथा अशा उमेदवारांचा मागासवर्गाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही. (दिनांक ०१/०४/२०११ पासून किंवा तद्नंतर सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल.)
३) उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणा-या वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. किंवा इ.मा.व. प्रवर्गातील तसेच खुल्या गटातील महिला, अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवारांनी वयोमर्यादा,आरक्षण या सवलतींसह कोणत्याही सवलतीस पात्र समजले जाणार नाही.
४) दिनांक २६ मार्च, २०१० च्या शासन निर्णयानुसार मागासवर्गीय उमेदवारांना नियुक्ती देताना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे.
५) सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम मधील तरतुदीनुसार विमुक्ती जाती (अ), भटक्या जमाती (ब),(क),(ड) प्रवर्गासाठी विहित केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनिय असेल.

- **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापनः**

१) शासनाने शासकीय विभागातील गट - अ,ब,क आणि ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५,दिनांक २८ मार्च, २००५ च्या अधिसूचनेद्वारे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन विहित केले आहे. या नियमांतील तरतुदींनुसार शासकीय सेवेतील पदासाठी अर्ज करतांना अर्जासोबत उमेदवाराने विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे.
२) प्रतिज्ञापनात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यात येईल.

- **इतर सूचना :**

१) पात्र उमेदवाराची निवड झाल्यास पुणे, अहमदनगर आणि नाशिक येथील पुणे विद्यापीठाच्या कार्यालयात नियुक्ती अथवा बदली करण्यात येईल.
२) उमेदवाराचा अर्जात दिलेला पत्रव्यवहाराचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक बदलल्यामुळे अथवा बंद केल्यामुळे अथवा टपाल विभागाच्या विलंबामुळे परीक्षेची संधी हुकल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.
३) अर्जदारांनी नावातील बदलाबाबत शासन राजपत्राची साक्षाकिंत प्रत अर्जाच्या प्रिंटआऊट सोबत जोडावी. विशेषतः महिला उमेदवारांनी नावातील बदलाबाबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा शासन राजपत्राची साक्षंकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
४) अर्जदाराने अर्ज करतेवेळी शिक्षण, वय, पदासाठी असलेले आरक्षण याबाबी विचारात घेऊन प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज ऑन लाईन (Online) भरावा.

५) ज्या राखीव प्रवर्गासाठी पद आरक्षित आहे, त्याच राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी त्या पदासाठी अर्ज करावेत. (अर्जाच्या प्रिंटआऊट सोबत जातीच्या प्रमाणपत्राची प्रत आणि असल्यास जाती वैधता प्रमाणपत्राची प्रत जोडावी.) महाराष्ट्र राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज केल्यास ते खुल्या प्रवर्गात गणले जातील.

६) सध्या सेवेत असणा-या उमेदवारांनी नियोक्त्याचे मूळ ना-हरकत प्रमाणपत्र अर्जाच्या प्रिंट आऊट सोबत पाठविणे आवश्यक आहे.

७) शासन निर्णयानुसार एम.एस.सी.आय.टी अथवा डी.ओ.इ.ए.सी.सी संस्थेचा 'सी.सी.सी.' किंवा 'ओ' स्तर, किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर परीक्षा उत्तीर्ण ही संगणक अर्हता आवश्यक आहे.

८) भरतीप्रक्रियेच्या संबंधित अधिकारी व सेवकांवर उमेदवाराने कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

९) उमेदवारांने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती /कागदपत्रे खोटी / बनावट असल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

१०) मुलाखत/नेमणूक यापैकी कोणत्याही टप्प्यावर टपालखात्याकडून उमेदवारास वेळेवर पत्र न मिळाल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

११) अर्जाची स्वीकृती किंवा तो नाकारणे याबाबत विद्यापीठामार्फत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१२) अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर (कार्यालयीन वेळेनंतर) प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

१३) जाहिरातीमधील नमूद पदे भरणे किंवा न भरणे याचा हक्क विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

**जाहिरात क्रमांक :४४**
**दिनांक : २९/१२/२०११**

**डॉ. मा. ल. जाधव**
कुलसचिव